# उपवनसंरक्षक वाशिम वनविभाग, वाशिम यांचे कार्यालय

वनवसाहत, सिव्हील लाईन वाशिम, जि. वाशिम पिन कोड-444505

**दुरध्वनी क्र.**- 07252-235589 **ईमेल** :- dycfwashim@mahaforest.gov.in

वनसंरक्षक
22 JAN 2021

मुख्य वनसंरक्षक (प्र.) यवतमाळ
क्रमांक 9684
दिनांक 24/12/21
6969

**विषय**:- Diversion of 0.72 ha Reserve Forest Land for Rehabilitation & Up-gradation of newly declared Badnera road Nagzari-Kherda and Murtizapur to Kherda of NH-161 E section from Washim to Dastapur Design to Two lane with paved shoulders in village Masola Tal. Magrulpir Dist. Washim in the State of Maharashtra – Regarding.

**क्रमांक**:- रस्ता सुधारणा / सर्व्हेक्षण/ 1976 /2020-21

**दिनांक**:- 24 / 12 /2020

**प्रति,**

कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मर्या.
शिबीर कार्यालय, वाशिम

**संदर्भ**- 1. केंद्र शासनाचे पत्र क्र. FC-I/MH-196/2020-NGP/7464, दि. 10.11.2020
2. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ वनवृत्त यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक- मुवसं(य)/कक्ष-10/वन(संवर्धन)/1814 दि. 17.11.2020.
3. या कार्यालयाचे पत्र क्र. सर्व्हे/1758/2020-21 दि.27.11.2020

------00000------

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 01 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वाशिम-दस्तापुर राष्ट्रीय महामार्ग क्र. 161 E रस्ता रुंदीकरणा करिता 0.72 हे. वनजमीन मागणी प्रस्तावास 1 ते 21 अटीच्या अधिन राहुन तत्वत: मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर तत्वत: मंजुरी पत्राची प्रत यासोबत जोडण्यात येत आहे. तसेच विषयाकिंत प्रकरणी संदर्भ क्र. 02 अन्वये केंद्र शासन तत्वत: मंजुरी पत्रात नमुद अटीनिहाय कॅम्पा खात्यात जमा करावयाचे रक्कमेचे मागणी पत्र (Demand) प्रकल्प यंत्रणेस देवुन, सदरची रक्कम केंद्र शासनाचे कॅम्पा खात्यात जमा करणे बाबत कळवुन संदर्भ क्र. 01 मधील तत्वत: मंजुरी मिळालेल्या पत्रातील अट क्र. 1 ते 21 ची पुर्तता अहवाल आवश्यक दस्ताऐवज व हमीपत्र (Undertaking) सह प्रकल्प यंत्रणेकडुन प्राप्त करुन तात्काळ सादर करणे बाबत सुचना या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत.

त्याअनुषगांने, प्रकल्प यंत्रणेस या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 03 अन्वये मागणी पत्र देण्यात आलेले होते, परंतु सदर मागणी पत्र नोडल अधिकारी कार्यालय नागपुर यांचेकडुन दि.09.12.2020 रोजी रद्द करण्यात आलेली असुन सुधारित मागणी पत्र खालील प्रमाणे :-

22/01
वनसंर.

1) अट क्र. ii नुसार या विभागातील मौजे कारंजा येथिल कक्ष क्र. सी-111 क्षेत्र 1.50 हे.आर. अवनत (Degraded) वनक्षेत्रावर घेण्यात येणाऱ्या पर्यायी वनीकरणासाठी अट क्र. iii मध्ये नमुद प्रमाणे 10 वर्षाकरिता तयार करण्यात आलेल्या योजनेनुसार **13,00,037.33/-** (अक्षरी- तेरा लक्ष सद्दोतीस रुपये फक्त).

2) अट क्र. iv (a) अन्वये सदर प्रकल्पामध्ये बाधित होणारे 0.72 हे. वनक्षेत्राचे नक्त वर्तमान मुल्य (Net Present Value) ची रक्कम **4,50,720/-** (अक्षरी- चार लक्ष पन्नास हजार सातशे वीस रुपये फक्त).

3) अट क्र. X अन्वये भरावयाची रक्कम

वर्तमान मुल्य NPV (हेक्टरी) = 6,26,000/-

उल्लंघन केलेले क्षेत्र (हेक्टर) = (222 मी. X 25 मी.) = 0.5550 हेक्टर

उल्लघन केलेला काळ = 1 वर्ष

उल्लंघित क्षेत्राचे वर्तमान मुल्य NPV रक्कम = (6,26,000 x 0.5550 x1 ) = **3,47,430/-**
12% व्याज = 12% x (347430) = **41691.6/-**
एकुण रक्कम = 347430 + 41691.6 = **389121.6/-** वनगुन्ह्यांच्या दंडाची एवढी रक्कम येत आहे. तथापि, **FCA Handbook Para No. 1.21 (ii) b.** In case of public utility projects of the government the penalty shall be 20 % of the penalty proposed in para (a) above. असे नमुद करण्यात आलेले आहे. त्याअनुषगांने सदर प्रकल्प लोकहितार्थ असल्यामुळे आपणास वनगुन्हा संदर्भात खालील प्रमाणे दंड आकारण्यात येत आहे.
प्रकल्प यंत्रणेने भरावयाची रक्कम = 20% (389121.6/-) = **77824.32/-** रु. (अक्षरी - सत्याहत्तर हजार आठशे चोवीस रुपये फक्त)
**4)** अट क्र. XIV अन्वये योग्य हद्द सिमांकित करण्यासाठी यंत्रणेने भरावयाची रक्कम **15,000 /-** (अक्षरी - पंधरा हजार रुपये फक्त).

अट क्र. VI मध्ये नमुद केल्यानुसार प्रकल्प यंत्रणेने एकुण रक्कम **18,43,581.65/- (अक्षरी- अठरा लक्ष त्रेचाळीस हजार पाचशे ऐक्यांशी रुपये फक्त)** (13,00,037.33 + 4,50,720 + 77824.32 +15,000) रुपये ही रक्कम कॅम्पा खात्या मध्ये e-portal (https://parivesh.nic.in/) व्दारे जमा करण्यात यावी.

त्याअनुषगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्र. 01 मधील अट क्र. 1 ते 21 चा अटीनिहाय पुर्तता अहवाल आवश्यक दस्ताऐवज व हमीपत्र (Undertaking) सह या कार्यालयास तात्काळ सादर करावा. जेणे करुन प्रकरणी पुढील कार्यवाही करणे सोयीस्कर होईल.

सुमंत सु. सोळंके (भा.व.से.)
उपवनसंरक्षक (प्रादे.)
वाशिम वनविभाग, वाशिम

**प्रतिलीपी** - मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादे) यवतमाळ वनवृत्त यवतमाळ यांना माहितीस सविनय सादर.